IIM NAGPUR

त्वरित प्रसारणासाठी

# आता पुण्यात उभा राहणार आय आय एम नागपूरचा उप-परिसर

सप्टेंबर ७, २०२१ | पुणे:

व्यवस्थापकीय संकल्पनांची उत्कृष्ट जाण असलेले, जागतिक दर्जाचे व मुल्यांची कदर असणारे व्यवस्थापक आणि उद्योजक निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने, राष्ट्रीय मान्यताप्राप्त 'आय आय एम, नागपूर' ही संस्था सहा वर्षापूर्वी नागपूरला स्थापन झाली. गेल्या सहा वर्षात या संस्थेने व्यवस्थापनशास्त्राचे शिक्षण आणि त्यात उद्योग जगताचे सहकार्य व सहभाग मिळवण्याच्या दृष्टीने लक्षणीय कामगिरी केलेली आहे. आता या संस्थेचा एक उप-परिसर पुण्याला उभा राहात असल्यामुळे पुण्याच्या विद्यर्थ्यांना, अभ्यासकांना उद्योग क्षेत्राचे आकर्षण वाटेल आणि उद्योग क्षेत्रात काही विशेष करू इच्छिणाऱ्यांना आपली उद्दिष्टे साध्य करायला हुरूप येईल.

आता पर्यंतच्या छोट्याश्या वाटचालीत या संस्थेन दोन वर्षांचा व्यवस्थापन शास्त्राचा पद्युत्तर कार्यक्रम विकसित केला आहे . या अभ्यासक्रमाचे प्रचंड आकर्षण आज भारतातल्या एमबीएचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना वाटत आहे. आज उद्योग क्षेत्रात प्रत्यक्ष व्यवस्थापकीय दर्जाचे काम करणाऱ्यांसाठी व्यवस्थापन शास्त्राचा, विशिष्ट उद्योगाशी निगडीत असा एमबीएचा अभ्यासक्रम तयार करण्याचे उद्दिष्टही संस्थेच्या डोळ्यासमोर आहे. त्याचप्रमाणे नव्याने उद्योग उभा करणाऱ्यांसाठी व अगदी नव्या बाल्यावस्थेतील उद्योगांच्या चालकांसाठी इनफेड (In-Fed) हा एक अत्यंत अभिनव असा उपयुक्त व काटेकोरपणे आखलेला अभ्यासक्रम या संस्थेने सुरु केलेला आहे. या अभ्यासक्रमाच्या आखणीसाठी शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील जाणकारांकडून मार्गदर्शन घेतले आहे.

आयआयएम नागपूर ने परिवहन क्षेत्राची कार्यक्षमता आणि उत्पादकता सुधारण्यावर काम करणाऱ्या सीआयआरटी (CIRT) पुणे या संस्थेसोबत एक सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे, आयआयएम नागपूर, सीआयआरटी कॅम्पसमध्ये आपला उप-परिसर उभारत आहे आणि संबंधित अभ्यासक्रमांसाठी उपक्रम राबवण्यासाठी योजना आखत आहे.

पुण्यातील या प्रकल्पाचा प्रारंभ म्हणून पुण्याच्या औद्योगिक जगतातील मान्यवरांशी आणि तज्ज्ञांशी ७ सप्टेंबर रोजी चर्चा आयोजित केली होती.

२०० अधिक उद्योग क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तींनी या चर्चेत भाग घेऊन त्यांच्या अनुभव संपन्न, उत्तम सूचना केलेल्या आहेत. यातूनच उभयपक्षी उपयुक्त असे ऋणानुबंध निर्माण होतील.

या प्रसंगी 'आय आय एम, नागपूर'च्या संचालक मंडळाचे अध्यक्ष आणि टेक महिंद्राचे एम डी आणि सी ई ओ श्री. सी. पी. गुरनानी म्हणाले, *"नागपूरच्या 'आय आय एम'च्या उप-परिसराची पुण्यात स्थापना होत आहे हे जाहीर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. पुण्यातील या उप-परिसराची स्थापना म्हणजे प्रचलित आणि प्रस्थापित पद्धती व्यतिरिक्त नव्या प्रकारे विचार करणारे, तरल बुद्धीचे पण धीरोदात्त वृत्तीचे, व्यवसायाच्या सतत बदलणाऱ्या परिस्थितीशी जुळवून घेऊन बदलत्या काळाबरोबर राहू शकणारे भावी नेतृत्व व्यवस्थापन क्षेत्रात निर्माण करण्याच्या संस्थेच्या धोरणाला अनुसरून टाकलेले पुढचे पाउल आहे. या परिसरात औद्योगिक क्षेत्रातील धुरीण व विद्वत-जन मिळून जागतिक दर्जाचे शिक्षण व समुपदेशन उपलब्ध करून देऊन उद्याचे नेतृत्व आकारू शकतील."*

प्रारंभी, प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या व्यावसायिकांसाठी कमी मुदतीचे व दीर्घ मुदतीचे व्यवस्थापनाचे शिक्षण देणारे आणि एमबीएचे अभ्यासक्रम सुरू केले जातील. संशोधन आणि सल्ला यात सहकार्य हा सुद्धा येथील कार्यक्रमाचा एक महत्वाचा पैलू असेल.

पुणे-परिसराच्या स्थापनेनंतर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमात 'आय आय एम, नागपूर'चे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी पुणे-परिसराबाबत काय काय योजना आहेत याची कल्पना दिली. त्यावेळी त्यांनी मुद्दाम सांगितले की संस्थेच्या अल्पावधीच्या कारकिर्दीतील पुणे-परिसराची स्थापना हा अत्यंत प्रतिष्ठेचा असा मैलाचा दगड आहे.

व्यवस्थापन पद्धतींवर एक वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवणे हे 'आय आय एम, नागपूर'ने अंगिकारलेल्या कार्याचे महत्वाचे सूत्र हे आहे. त्या दृष्टीने पुण्याच्या परिसराची स्थापना ही एक मोठी झेप आहे.

- *End of Text.*

For more details about the Institute, please contact Mr Sachin Farfad Patil (Officer, Branding and Corporate Communication), on 9975633461 or media@iimnagpur.ac.in